नि दरखास्त **क्र. ०४/२०२५**

//६// **रंजना वि. शिवदास**

**धनको सा.क्र. १(नि.क्र.५० )**

**<u>उलटतपास ऋणको तर्फे. श्री बी डी जाधव वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

७ दिनांक २९/०३/२०२६ रोजी मी गोविंद कापसे आणि त्यांचेसोबत दोन व्यक्तींना मशागतीकरीता वादमिळकतीमध्ये पाठविले होते. मी स्वता त्यादिवशी वाद मिळकतीत गेलो नव्हतो. मी पाठविलेले मजूर प्रत्यक्ष वाद मिळकतीत गेले होते का याची माहिती मी घेतली होती. हे खरे नाही की, वादमिळकतीच्या शेजारीच केशव रेडडी यांची जमीन आहे. केशव रेडडी यांची जमीन वाद मिळक्तीच्या आजूबाजूला कोठेच नाही. हे खरे की, हणमंत हंडरगुळे व त्याचा मुलगा यांना न्यायालयाने पंचनामा करण्यासाठी हजर राहण्यास सांगितले नव्हते, मी सांगतो की, पंचनामा करावा असा न्यायालयीन आदेश असल्याने पंचनामासाठी मी त्यांना घेवून गेलो. हे खरे की, कोणताही गुन्हा खरा आहे की खोटा आहे हे ठरवायचा अधिकार न्यायालयाचा आहे. केशव यांचया वडिलांनी उच्च न्यायालयात केलेले अपिल काढून घ्यावे म्हणून मी वारंवार केशव यांना धमकावित होतो, हे खरे नाही. दिवाणी तुरुंगाचा अर्ज जाबदार विरुध्द दिल्यानंतर आम्ही आमच्या नावाच्या पाटया दावा मिळकतीत उभारल्या होत्या, यास माझे सांगणे की, दिनांक २३/०४/२०२६ रोजी त्या पाटया उभारल्या होत्या. केशवला तुरुंगात ठेवता यावे यासाठी पूरावा असावा म्हणून खोटेपणाने या पाटया मी उभारल्या होत्या, हे खरे नाही. हे खरे नाही की, या पाटया मी माझ्या ओळखीच्या लोकांकडून आणि चंद्रकांत बूचंपल्ले यांच्या मुलाकडून तोडून घेतल्या. हे खरे नाही की, गट क ५२७ व ५२८ मध्ये आम्ही पाटया लावल्याच नव्हत्या. हे खरे नाही की, कोणतीही घटना घडली नसताना पोलीस ठाण्यात जावून आम्ही खोटी तक्रार दाखल केली. हे खरे नाही की, तथाकथीत घटना घडली त्यादिवशी केशव गावातच नव्हता. मी चंद्रकांत बुचमपल्ले यांना लहानपणापासून ओळखतो. चंद्रकांत यांची जमीन दावा मिळकतीच्या उत्तरेला आहे. २०१५ साली दावा मिळकतीच्या उत्तरेला कोणाची जमीन होती हे मला आठवत नाही, दक्षीणेला शिवदास चामे यांची जमीन होती. शिवदास हे केशव यांचे वडिल होत हे खरे

आहे.  मी गोविंद कापसे यांना अंदाजे पंधरा वर्षांपासून ओळखतो.  गोविंद कापसे यांना उन्हाळी काम करायला आम्ही नेमले होते अशा आशयाचा दस्त नाही. रंजना हिने मला सर्वाधिकारपत्र फक्त प्रकरण पहाण्याकरीता दिली आहे, साक्षीकरीता नाही, हे खरे नाही.  हे खरे नाही की, ऋणको क्र १ हा गुंड प्रवृत्तीचा असून तो माझ्या शेतात येण्यास मला मज्ञाव करतो असे मी खोटे लिहीले आहे. दिनांक २३/०४/२०२६ रोजी बसविलेल्या पाटया केशव वगैरे लोकांनी उपडून टाकल्या असे मी खोटे सांगतो हे खरे नाही.  गोविंद कापसे यांना उन्हाळी कामासाठी मी नेमले होते, असे मी खोटे सांगतो, हे खरे नाही.  हे खरे नाही की, केशवने कधीही दावा मिळकतीत जाण्याकरीता मला हरकत केलेली नाही.  हे खरे नाही की, केशवने माझ्या मजूरांना शेतात जाण्यास कधीही मज्ञाव केला नाही. केशवच्या आई यांनी माझ्याविरुध्द मी त्यांन घरात घूसून धमकावले म्हणून फौजदारी खटला केला आहे, याबददल मला माहिती नाही.  हे खरे नाही की, मी माझे शपथपत्र खोटे आहे व मी खोटी साक्ष देत आहे.

**( उलटतपास पुर्ण.)**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष

स्वाक्षरीत/–

**( एस.एन.सरडे )**

दिनांक ०७/०५/२०२६  दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर